८. प्रस्तावित उत्सवाच्या/समारंभाच्यावेळी किंवा प्रस्तावित तात्पुरते रचना उभारण्यात येत असल्यावेळी संबंधित सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांना किंवा त्याच्याद्वारे प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी यांना परवानगीत नमूद अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होत आहे किंवा नाही तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची खात्री करण्याकरीता, परवानगी देण्यात आलेल्या ठिकाणी कोणत्याही वेळेस निरीक्षण करता येईल.

९. सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांना जर असे आढळून आले की, उभारण्यात आलेले तात्पुरते बांधकाम मनपा अधिनियम कलम २३४ अंतर्गत दिलेल्या परवानगीनुसार नाही किंवा परवानगी दिलेल्या जागेचा वापर दिलेल्या प्रयोजनाकरीता होत नसून इतर प्रयोजनाकरीता होत आहे किंवा खोटे व बनावटी दस्ताऐवजांच्या आधारावर परवानगी मिळविण्यात आलेली आहे तर दिलेली परवानगी त्यांना परत घेता येईल किंवा निरस्त/रद्द करता येईल.

१०. बिनापरवानगीने रस्त्यांवर किंवा फूटपाथावर उभारण्यात आलेले कोणतेही तात्पुरते रचना त्याला उभारण्याकरीता प्रथमदृष्ट्या जबाबदार व्यक्तिच्या खर्चाने किंवा असे तात्पुरते रचना ज्याची परवानगी या धोरणातील खंड ९ प्रमाणे परत घेण्यात/निरस्त करण्यात आलेली असेल तर संबंधित अर्जदाराच्या/संस्थेच्या खर्चाने काढून टाकण्याचे किंवा पाडण्याचे अधिकार सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांना राहतील. जर तीन दिवसापेक्षा जास्त किंवा कमी कालावधीकरीता परवानगी देण्यात आलेली असेल तर सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी संबंधित अर्जदाराला किंवा संस्थाला उभारण्यात आलेले तात्पुरते रचना काढण्याबाबतचे मनोदयाची सूचना ठरविलेल्या वेळेचे २४ तास अगोदर लेखी स्वरुपात देईल.

११. सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांना कुठल्याही परिस्थितीत कोणत्याही रस्त्यावर किंवा फूटपाथवर १५ दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी तात्पुरते रचना उभारण्याची परवानगी देता येणार नाही.

१२. प्रस्तुत धोरणाचे खंड १० अंतर्गत काढण्यात/पाडण्यात आलेले तात्पुरते रचनाकरीता संबंधित अर्जदाराला किंवा संस्थेला झालेल्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानाची भरपाई महानगरपालिकेद्वारे करण्यात येणार नाही याउलट महानगरपालिकेला ती रचना काढण्याकरीता/पाडण्याकरीता आलेल्या खर्चाची वसुली सहाय्यक आयुक्त/वार्ड अधिकारी यांनी दिलेल्या देयकानुसार संबंधित अर्जदारांकडून किंवा संस्थांकडून करण्यात येईल.

१३. सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांची परवानगी देण्याबाबतचा किंवा अर्ज खारीज करण्याबाबतचा किंवा दिलेली परवानगी परत घेण्याबाबतचा/निरस्त करण्याबाबतचा निर्णय, निर्णायक व अंतिम समजण्यात येईल.

१४. दिलेल्या परवानगीचा कालावधी संपल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत २४ तासाच्या आत अर्जदाराने स्वतः उभारलेले तात्पुरते बांधकाम स्वखर्चाने काढून टाकावे असे न केल्यास रु. ५० प्रती तासाप्रमाणे दंड आकारण्यात येईल. दिलेल्या मुदतीच्या २४ तासानंतरही तात्पुरते बांधकाम काढण्यात आलेले नसेल तर संबंधित सहायक आयुक्ताने/वार्ड अधिकाऱ्याने ती रचना त्वरित काढून/पाडून टाकावी व गुन्हे व्यवहार संहितेच्या कलम १३३ अंतर्गत सार्वजनिक उपद्रवाबाबत जिल्हादंडाधिकाऱ्याकडे संबंधित अर्जदार/संस्था विरुध्द तक्रार करावी तसेच या व्यतिरिक्त संबंधित अर्जदाराला/संस्थाला त्या जागेवर कोणत्याही प्रकारच्या उत्सव/समारंभाप्रसंगी कोणत्याही प्रकारचे तात्पुरते बांधकाम उभारण्याची परवानगी पुढील पाच वर्षाकरीता देण्यात येवू नये असे लेखी आदेश काढावे.

१५. प्रस्तावित उत्सव/समारंभ साजरा करण्याकरीता आवश्यक विविध प्राधिकरणांची परवानगी मिळविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदाराची/संस्थांची राहील.

१६. पर्यावरण विभाग, पोलिस विभाग, विविध न्यायालये, नागपूर महानगरपालिका व इतर सक्षम प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशांची काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित अर्जदार/संस्थांची राहील.

१७. संबंधित उत्सवाकरिता, अर्जदाराने/संस्थेने मिळालेल्या विविध आवश्यक परवानगींची प्रत उभारण्यात आलेल्या पेन्डॉल/मंडप/स्टेज किंवा स्वागतद्वार/कमानीच्या दोन्ही बाजूस दर्शनी भागात, सामान्य नागरिकांना सहज पाहता येईल अशा आकारमानात प्रदर्शित करण्यात यावी.

१८. अर्जदाराने/संस्थेनी ध्वनी प्रदूषण, आरोग्य संबंधी तक्रारी, सुरक्षा व विविध प्रकाराच्या उपद्रवांची तक्रार ज्या सक्षम प्राधिकरणाकडे करता येईल त्या सर्व सक्षम प्राधिकरणांचे नांव, हुद्दा त्यांचा मोबाईल नंबरसह उभारण्यात आलेल्या तात्पुरते रचनेच्या दर्शनीय भागात सर्वसाधारण जनतेला सहजपणे दिसेल अशा आकारमानात प्रदर्शित करण्यात यावे. प्रस्तुतकर्ता अर्जदार/संस्था यांचे तपशीलमध्ये संस्था/अर्जदाराचे नाव, पत्ता, दूरध्वनी आणि भ्रमणध्वनी जोडण्यांत यावा.

१९. प्रस्तुत धोरणांतर्गत सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांचेद्वारे देण्यात आलेली परवानगी कोणतेही कारण न सांगता परत घेण्याचे किंवा निरस्त करण्याचे संपूर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्तांकडे राहतील.

२०. रस्त्यावर चूल पेटवून स्वयंपाक करण्यास सक्त मनाई आहे. केल्यास २०००/- रु. दंड आकारण्यात येईल व भांडे जप्त करण्यात येईल.

२१. नाकारण्यात आलेल्या अर्जासाठी अर्जदार/संस्था यांना अति. आयुक्त/आयुक्तांकडे अपील करता येईल.

२२. राजनैतिक धरणे व वेळोवेळी ठरलेल्या कार्यक्रमांच्या परवानगीकरिता आलेल्या अर्जावरती निर्णय देण्याचा अधिकार सहा. आयुक्तांकडे राहील. अशा प्रकरणांस २५ दिवसापूर्वीची अट राहणार नाही.

२३. आयोजकास दिलेल्या परवानगीच्या जागी पर्यावरण, स्वास्थ्य, स्वच्छता व इतर जनजागृतीच्या घोषणा फलक उभारणाऱ्यास म.न.पा. प्रशस्ती पत्र देईल.

२४. नियम व अटीचे पालन न करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल.

२५. एक खिडकी योजनेद्वारे प्रशासनिक अनुमती देण्याची व्यवस्था प्रत्येक झोनमध्ये ठेवण्यांत यावी.

२६. तक्रार निवारण यंत्रणा :— महापालिकेतील प्रत्येक विभागीय कार्यालयाचे सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी आपल्या विभागीय कार्यालयाकरिता एक तक्रार निवारण अधिकारी, जो सहायक अभियंता/ उप-अभियंता पेक्षा खालील दर्जाचा नसावा, ची नेमणूक करावी जेणे करून सदर धोरण अंतर्गत मोडत असलेले तात्पुरते बांधकामांमुळे नागरिकांना होणा-या त्रासाबद्दल नागरिकांना या अधिका-यांकडे तक्रार नोंदविता येईल. नोंदविण्यात आलेल्या तक्रारींच्या समाधानाकरीता संबंधित प्राधिकरणांनी त्वरित कार्यवाही करणे अनिवार्य आहे. सहाय्यक आयुक्त / तक्रार निवारण अधिकारी यांनी खालीलप्रमाणे विहित नमुन्यात तक्रार-पुस्तिका आपल्या विभागीय कार्यालयात ठेवावी व त्यामध्ये प्राप्त झालेल्या लेखी किंवा तोंडी तक्रारींचा तपशील नोंदवावा.

| अनु. क्र. (१) | तक्रारीचा दिनांक आणि वेळ (२) | तक्रारकर्त्याचे नांव, पत्ता, दुरध्वनी/मोबाईल (३) | तक्रारीचा तपशील (४) | करण्यात आलेली कार्यवाही (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांनी या तक्रार पुस्तिकेचा नियमितपणे पुनर्विलोकन करावे व नोंदविण्यात आलेल्या तक्रारींचे जलद निवारणाची खात्री पटवून द्यावी. जर नोंदविण्यात आलेली तक्रार महानगरपालिकेशी संबंधित नसेल किंवा ध्वनी प्रदूषणासंबंधी असेल तर ती तक्रार संबंधित प्राधिकरणाकडे त्वरित कार्यवाहीस्तव वळविण्यात यावी.

२७. प्रस्तुत धोरण महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येईल.

नागपूर :
दिनांक ८ ऑक्टोबर २०१५.

श्रावण हर्डीकर,
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १६६.

## अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अंतर्गत फेरबदल करणेबाबत

क्रमांक नर-मुअ-नपगों-वि यो.(सु.)-गोंदिया-फेरबदल-३८६-२०१५.—

गोंदिया शहराची विकास योजना (दुसरी सुधारित) शासनाने नगर विकास विभागाचे निर्णय क्र. टीपीएस-२३११-२१८६-सीआर-२४२(ब)-२०११-युडी-९, दिनांक ४ एप्रिल २०१२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १५ मे २०१२ पासून अंमलात आली आहे.

उक्त मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्यासाठी नगर परिषदेने दिनांक ११-८-२०१५ रोजीच्या आमसभेत खालीलप्रमाणे ठराव पारित केलेले आहेत.

| अ. क्र. (१) | मंजूर योजनेनुसार आरक्षण/प्रस्ताव (२) | जागेचा तपशील (३) | न. प. आमसभा ठराव क्रमांक व दिनांक (४) | कलम ३७ अंतर्गत फेरबदल करण्याचा प्रस्ताव (५) |
|---|---|---|---|---|
| १ | ना-विकास क्षेत्र | मौजा-गोंदिया बु., गट सर्व्हे नं. ५००, ५००/१, ५००/३, ४९३/१, १ | ठराव क्र. ५४, दिनांक ११-८-२०१५ | रहिवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेबाबत. |

अध्यक्ष, नगर परिषद, गोंदिया यांनी दिनांकित स्वाक्षरी केलेले उपरोक्त फेरबदल दर्शविणारे नकाशे न. प. कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यांत आले आहेत.

उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये जाहीर करण्यात येते की, उपरोक्त नमूद फेरबदल करण्याबाबत कोणासही कांही हरकती वा सूचना असल्यास, त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आंत गोंदिया नगर परिषदेस लेखी सादर करावयात.

उपरोक्त फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यापूर्वी नागरीकांकडून प्राप्त झालेल्या सूचना वा हरकतीवर नगर परिषदतर्फे विचार केल्या जाईल.

गोंदिया :
दिनांक २२ सप्टेंबर २०१५.

कशिश जैस्वाल,
अध्यक्ष,
नगर परिषद, गोंदिया.

ना.-एक अ-३ (१६७०).